**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 1, Jan-Feb – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 12/01/2020 Accepted on : 25/01/2020 Publication Date: 28/02/2020

# 'चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा–अंधारी व्याघ्रप्रकल्पातील वन्यप्राण्यांचे प्रबंधन व पर्यटन विकास'–एक भौगोलीक अभ्यास

**प्रा. महेश प्रभाकर रत्नपारखी**
भूगोल विभाग कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
बदनापूर, जिल्हा. जालना (महाराष्ट्र)
Email - maheshgeo27@gmail.com

**सारांश** (Abstract) **:** भारतातील वने व वन्यजीव जगतातील 2.5 टक्के भौगोलीक क्षेत्रातील महत्वाची व समृध्द जैव विविधता मानल्या जाते. येथे 91000 प्राण्यांच्या विविध जाती व 45000 वनस्पतींच्या जाती नोंदनीकृत केल्यास आहेत. भारतातील राष्ट्रीय उद्याने, प्राणी संग्राहलये व अभयारण्ये ही केवळ वनांचे व वन्यप्राण्याचे स्वरक्षण करीत नाही तर पर्यटकांना सुविधा सुध्दा पुरवितात व स्थानिक लोकांच्या आर्थिक विकासा करीता सहयोग करतात. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्य वने व वन्यप्राण्यांच्या संरक्षणाकरीता प्रथम प्राधान्य देतात, सोबतच राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पर्यटकांना आकर्शीत करतात ज्याचा फायदा स्थानीक अर्थव्यवस्था विकासाकरीता होतो. वन्यजीव व्यवस्थापनाच्या क्षेत्रात पर्यटन व्यवसाय वन्यजीव व्यवस्थापन, वाढीची व स्थानिक अर्थव्यवस्था संवर्धन अशी दुहेरी भूमिका पार पाडत असतो. परंतु दुसरीकडे ते राष्ट्रीय उद्यान व अभयारण्य स्थापने करीता प्राथमिक प्रकारचा अळथळा निर्माण करु शकतो. जर अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानांच्या क्षमतेपेक्षा पर्यटकांची संख्या जास्त असेल तर नियोजनाला बाधा येते. करीता पर्यटन व प्राणीसंरक्षण याच्यात समतोल प्रस्तापीत करणे आवश्यक आहे.

**बिजसंज्ञा :** व्याघ्र पर्यटन, वन्यप्राण्यांचे प्रबंधन, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना.

## १ प्रस्तावना (Introduction) :



वन्यजीव व्यवस्थापन आणि संवर्धन हे पर्यावरणीय तसेच व्यवस्थापकीय संदर्भात आव्हान आहे. कारण जगातील जैवविविधता दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे. भारत जैवविविधतेच्या बाबतीत समृध्द आहे, या बाबतीत देशाचा जगात 12 वा क्रमांक लागतो. जागतीक क्षेत्रफळाच्या बाबतीत केवळ 2.4 टक्के क्षेत्र भारताचा आहे. सध्याघडिला भारतात 661 संरक्षित क्षेत्र, 100 राष्ट्रीय उद्याने, 514 प्राणी संग्रहालये, 38 व्याघ्र प्रकल्प, 43 राखील आरक्षित जंगले या माध्यमातुन नष्ट होणारे वनस्पती व प्राणी यांचे सवंर्धन केल्या जात आहे. भारतीय उपखंड हा प्राचीन काळापासून वाघांच्या संवर्धनासाठी प्रसिध्द आहे, जागातील वाघांच्या एकुण संखेच्या 60 टक्के वाघ भारतात आहेत परंतु अलीकडे यांच्या संखेत व अधिवास क्षेत्रांमध्ये तिव्रतेने घट झाल्याचे पहावयास मिळते, महाराष्ट्रराज्यातील **'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प'** (TATR-Tadoba-Andhari Tiger Reserve) वन्यप्राण्यांचे प्रबंधन तसेच परिस्थितिकिय पर्यटना करीता व व्याघ्र संरक्षणाच्या बाबतीत अत्यंत यशस्वी राहीले आहे. (TATR) ने रॉयल बंगाल टायगर (Penthera tigris tigris) सह अनेक संवेदनशिल व नष्टप्राय होणाऱ्या प्रजातींना स्वंरक्षण प्रदान केले आहे. वाघांच्या संखेच्या आणि पर्यटनाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्यातील सर्वात महत्वाचे व्याघ्र अभयारण्य आहे परंतु अलीकडे वन्यप्राणी व मानव यांच्यात संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे, (TATR) ला लागुन असलेल्या भागांमध्ये वाघांनी अनेकदा मानसांवर व प्राण्यांवर हल्ले केल्याचे आपन ऐकत असतो. अशी स्थिती पर्यटनाच्या दृष्टीकोणातून कठीन व निर्णायक आहे. महाराष्ट्रातील दुसरा व्याघ्र प्रकल्प म्हणुन 1994–95 मध्ये याचा विकास करण्यात आला. पर्यटकांसाठी हे अतिषय महत्वाचे ठिकाण बनले आहे दरवर्षी सुमारे एक लाखपेक्षा जास्त पर्यटक येथे भेट देतात. शहरातील दूशीत हवामान व यामुळे शुध्द हवा घेण्यासाठी पर्यटकांचा कल येथे वाढत आहे. सदर संशोधनामध्ये स्थानीक ग्रामीण वन्यजीव व्यवस्थापनावर पर्यटनाच्या परिणामांचे परिक्षण करुन प्रभावी व्यवस्थापनासाठी सर्वोत्तम पध्दती सुचविली आहे.

**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 1, Jan-Feb – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 12/01/2020 Accepted on : 25/01/2020 Publication Date: 28/02/2020

## २ अभ्यास क्षेत्र (Study Area) :

**'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प'** (TATR) महाराष्ट्र राज्याच्या अगदी पूर्वेला असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात आहे. याची अक्षांश व रेखांश स्थिती पुढील प्रमाणे $79^0$ 3′ 13′′ ते $79^0$ 33′ 34′′ पुर्व रेखांश $20^0$ 4′ 53′′ ते $20^0$ 25′ 51′′ उत्तर अक्षांसावर आहे. या प्रदेशाची संमुद्र सपाटी पासुन उंची 284.07 मीटर असुन, एकुण क्षेत्रफळ 625 किमी. आहे. यात 116.55 वर्ग किमी. ताडोबा अभयारण्याचा व 508.85 वर्ग किमी. अंधारी व्याघ्रप्रकल्पाचा समावेश होतो. येथिल वार्षीक पर्जन्यमान 1175 मी.मी. आहे. भारतीय पर्यावरणविभागा तर्फे काही मुख्य जैव विविधता क्षेत्र घोशित केली आहेत त्या पैकी दख्खनच्या पठारावरील प्रमुख जैव विविधता B-6 या विभागात (TART) चा समावेश केला आहे. चॅपीयन या हवामान शास्त्रज्ञांनी येथील वनस्पतींचा समावेष दक्षिण उष्ण प्रदेशीय कोरडी पानझडी वनांमध्ये केला आहे. (TATR) ची घोषना 1995 मध्ये करण्यात आली, परंतु याचा इतिहास यापेक्षाही फार जुना आहे. संपुर्ण व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर जिल्ह्याच्या उत्तरेला 45 किमी. वर आहे. चंद्रपूर हे जिल्ह्याचे ठिकाण असुन पर्यटकांच्या संपुर्ण गरजा पुर्ण करतो. या ठिकाण (TATR) चे मुख्यालय, चंद्रपूर वन विभागाचे मुख्य कार्यालय, सफारी बुकिंग (पर्यटन नोंदनी) कार्यालय आहे. (TATR) च्या चहु बाजुला रल्वे चा विकास झालेला आहे त्यामुळे येथे देशाच्या कोणत्याही प्रदेशामधुन पर्यटक सहज पोहचु षकतो. **तारु** या गोंडांच्या देवते वरुन ताडोबा हे नांव तर या प्रदेशातुन वाहणाऱ्या अंधारी नदीच्या नांवावरुन अंधारी नाव पडले आहे. (TATR) मध्ये पाणझडी वृक्षांचे प्राबल्य आहे, बांबु (Bambusa Indica) व सागवृक्ष (Teetona grandis) हे येथील मुख्य वृक्ष आहेत. उन्हाळयात या वृक्षांची पाणे झडतात, या काळात अत्यंत दाहक उन्हाळा असतो त्यामुळे (TATR) मधील सर्वच पाणवठे कोरडी पडतात, त्यामुळे येथिल वन्य प्राण्यांना कृत्रीम पानवठे तयार करुन (TATR) प्रबंधनाकडून पानी पुरवठा केल्या जातो. तसेच कृत्रिम कुरने सुध्दा येथिल लोकांकडून जोपासली जातात.



आकृती क्र.

## ३ संशोधनाची उद्दीष्टे (Objective of Research) :

संशोधन पत्रिकेचा उद्देश **'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प'** मधील वन्यजीव संरक्षन व्यवस्थापन पध्दती आणि येथिल पर्यावरणासबंधी जी स्थिती आहे त्याला अनुसरुन पुढील उद्दीष्ठे ठरवीली आहेत.

i. वर्तमान व भूतकाळातील वन्यजीव व्यवस्थापकीय प्रबंधन पध्दतीचे परिक्षण करने.
ii. आरक्षित क्षेत्रावरील पर्यटनाचा सद्याचा दबाव समजुन घेणे, व वन्यजीव व्यवस्थापनावर होणारा परिणाम अभ्यासने.
iii. **'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प'** मधिल पर्यटनाचा सभोवतालच्या खेड्यांच्या अर्थिक स्थितीवर कसा प्रभाव झाला आहे ते तपासने.
iv. पर्यटन आणि वन्यजीव व्यवस्थापनाच्या नियोजना संदर्भात '**राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण**' आणि **राज्य वन विभागा**ला व्यापक धोरन राबविण्यास सूचना करणे.

## ४ अभ्यास पध्दती (Methodology) :

सदरील संशोधन तोडोबा प्रशासनाकडून तसेच वन विभागाशी सबंधीत वेबसाईड वरुन प्राप्त झालेल्या दुययम माहितीच्या आधारावर आहे. (TATR) मध्ये भेटी देणाऱ्या पर्यटकांची संख्या, वाहणांची माहीती यांच्या व्यतिरिक्त पर्यटक मार्गदर्शकांची संख्या, (TATR) मधील प्रवेशद्वारांची महीती ताडोबा प्रशासनाकडून प्राप्त केल्या गेली. महाराष्ट्र शासनाचे पर्यटन धोरण आणि पर्यावरण पर्यटन योजना तसेच (TATR) ची व्याघ्र संवर्धन योजना हे राज्य सरकारचे पर्यटन धोरण समजुन घेण्याचे एक साधन मानले जाते. पर्यटक रिसार्ट मधील पर्यटकांचा दबाव समजून घेण्याकरीता वनपरिक्षेत्र आधिकारी

आणि चंद्रपूरच्या '**वन्यप्राणी संवर्धन व्यवस्थापक**' (Wildlife Warden) आधिकारी यांच्या व्यतिरिक्त वन व्यवस्थापक आणि त्यांच्या संचालकांची मुलाखतीद्वारे गावाच्या विकासात संसाधन आणि पर्यटनाची भुमिका समजावुन घेण्यात आली. (TATR) मधिल वाहन चालकांकडून मानव व प्राणी संघर्षा विषयी माहीती घेतले आहे.

## ५ वन्यजीव व्यवस्थापन, इतिहास व प्रकल्पातील नविन उपक्रम (History of wildlife management and new initiative) :

**'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प'ची** घोषणा 1995 मध्ये करण्यात आली परंतु त्याहीपुर्वी 1873 मध्ये या प्राणी संग्रहालयाला रितसर सुरक्षा प्रदान करण्यात आली व 1879 मध्ये हे वनक्षेत्र राखीव वन म्हणून घोषीत करण्यात आले. 1905 मध्ये ताडोबा मध्ये प्राण्यांच्या शिकारी करीता शासनाकडून बंदी घालण्यात आली. 1927 मध्ये ताडोबा राष्ट्रीय उद्यानाला सर्वसाधारन नियमातुन वगळण्यात आले, आणि 1931 मध्ये केवळ वाघांच्याच नाही तर सर्वच प्राण्यांच्या शिकारीवर बंदी घालण्यात आली. 1925–26 मध्ये पहील्यांदा सुनियोजीत क्षेत्रांचा नकाशा तयार करण्यात आला, 1935मध्ये ताडोबा सरोवराच्या 45 किमी सभोतालच्या परीसराचा यात समावेश केला, 1955 मध्ये संरक्षीत करुन 'ताडोबा राष्ट्रीय उद्यान' घोषीत करण्यात आले. 1942 पर्यन्त सांबर व चितळ या शाखाहारी प्राण्यांच्या संखेत वाढ झाली, याच वर्षी हे क्षेत्र पर्यटना करीता आरक्षाणामध्ये परीवर्तीत करण्यात आली. ताडोबा व सभोवतालचा प्रदेश जसे मोहर्ली, कोळसा व मुल येथिल वनेसुध्दा आरक्षित कण्यात आली व शिकारी करीता बंदी घालण्यात आली. पूर्वी विशीष्ट परवानगी मिळवुन या वनांमध्ये शिकारीची मान्यता होती, अशा प्रकारची परवानगी 1973–74 पर्यन्त होती. व्याघ्र प्रकल्पाची घोषना झाल्यानंतर मोहर्ली, कारवा, कोळसा व मुल या विभागांत शिकारीस बंदी घलण्यात आली. ताडोबा अभयारण्याच्या कोर क्षेत्रात असलेल्या खातोडा व पांढरपौणी या दोन खेड्यांचा 1972 मध्ये स्थलांतरन केल्या गेले. 1995 मध्ये शासनाने '**ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प**' घोशीत केले व तसा आदेश काढला, 1997 ला पहील्यांदा सुनियोजीत व्यवस्थापन केल्या गेले, 2006 ला कोळसा व बोटेझरी या कोर क्षेत्रातील गावांचे स्थलांतरन भगवानपुर या ठिकाणी करण्यात आले. या सर्व व्यवस्थापनाकरीता **'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पा'ने** पुढाकार घेतला आहे.

- प्रशासकिय नियोजनः राष्ट्रीय उद्यानांमध्ये शासकीय योजना राबनिण्यासाठी व्याघ्रप्रकल्पाचे प्रशासकीय व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे आहे. याकरीता (TATR) मध्ये विशेष कामकाजाची योजना राबविण्यात आली असुन आधीच्या योजना वगळण्यात आल्या आहेत. वन्यप्राण्यांच्या संरक्षणांकरीता वनाधिकाऱ्यांनी '**टायगर कंझर्वेशन प्लान**' तयार केला आहे.
- (TATR) च्या कोर क्षेत्रामध्ये रस्त्यांचा विकास केला आहे, हा सुध्दा प्रबंधनाचा एक भाग आहे, जवळपास 125 किमी. नविन रस्त्यांचे बांधकाम कारण्यात आले तर जुण्या रस्त्यांची डागडुजी करुन त्याची सुधारणा करण्यात आली आहे. उन्हाळ्याात जंगलामध्ये वनव्या सारख्या घटना घडूनये करीता व त्यावर नियंत्रन ठेवण्या करीता जंगलामध्ये मणोरे उभे करण्यात आले आहेत. येथिल कर्मचाऱ्यांना वायरलेस भ्रमणध्वणी प्रशासनाकडुन उपलब्ध करुन देण्यात आले आहे, बिटगार्ड, सुरक्षा रक्षक व चौकीदार यांना प्राण्यांच्या सुक्ष्म हालचालीवर लक्ष ठेवण्याकरीता दर्जेदार कॅमेरे पुरविण्यात आले आहेत. तसेच त्यांना शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षणसुध्दा देण्यात आले आहे, रात्रीच्या वेळेस कोणत्याही प्राण्यांची षिकार होवु नये करीता (TATR) कर्मचारी गस्तीवर असतात. उन्हाळ्ययामध्ये पाणवठे कोरडे पडले असता प्राण्यांना पाणी पुरवाठा केला जातो. या कामा करीता वर्षाचा बजेट 671 लक्ष एवढा आहे. पार्कच्या सभोवतालच्या भागांमध्ये मगरांचे प्रजनन केंद्र उभारण्यात आले आहे.
- '**महाराष्ट्र वन विकास महामंडळ**' (FDCM) ची उपषाखा असलेल्या वन विभागा मार्फत अग्नीशमन कामगारांद्वारे वनांमध्ये लागलेल्या आगीवर नियंत्रन ठेवल्या जाते. आणी गेल्या दोन वर्षा पासुन हे कार्य उत्तम पणे बजावल्या जात आहे (FDCM) कडुन प्रत्येक वर्षी 15 फेब्रुवारीला जंगलाची आखनी केल्या जाते. अग्निशमन यंत्रनेवर नियंत्रनाचा वार्षीक खर्च 57 लक्ष रुपये आहे. जंगलात 20मीटर, 15मीटर, 10मीटर व 5मीटर अशा प्रकारच्या फायर लाईन्स तयार करण्यात आल्या आहेत. याची कामगांराकरवी निरंतर देखभाल केली जाते.
- वन गुन्हेगारी ही घटनासुध्दा महत्वपुर्ण आहे, या करीता वनविभागातील कर्मचारी असे गुन्हे घडु नयेत करीता दक्ष असतात. (TATR) प्रशासना कडून अशा कर्मच्याऱ्यांना करमुक्त दुरध्वनी कमांक (Toll free) दिलेले आहेत जेनेकरुन गुन्हेगारी सबंधातील माहीती लवकरात लवकर पुरविल्या जाईल, (TATR) च्या सभोवतालच्या गांवातील लोक सरपना करीता कोर क्षेत्रामध्ये जावु नयेत म्हणून वनविभागांकडुन त्यांना गॅसशेगडी पुरविण्यात आली आहे. तसेच गोबर गॅस प्लॉन्ट, सोलर लॅम्प ची सुविधा पुरविण्यात आली आली आहे. जंगलाच्या वाढीकरीता व व्यवस्थापना करीता '**संयुक्त वन व्यवस्थापन**' (JFM) कमीटी '**वन बचाव कमीटी**' (Forest protection committees) या सारख्या समित्यांची स्थापना (TATR) मध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने (TATR) मधील बफर झोनची घोषना केली, याचामुख्य उद्येश येथिल विकास करणे होय, (TATR) चे एकुण मुख्य भौगोलीक क्षेत्र 625.40 वर्ग किमी. असुन बफर झोनचे क्षेत्रफळ 1101.77 वर्ग किमी. आहे या क्षेत्रात 79 खेडयांचा समावेश आहे.

- पांढरपौणी, खातोडो तसेच नव्याने पुर्नवसीत नवेगांव या गांवामध्ये कुरणांचा विकास करण्यात आला, जेणे करुन याकडे शाकाहारी प्राणी आकर्शीत होतील. या कुरणांची सतत कापनी करणे, झुडपांचे नियंत्रन करणे या गांवातील स्थानिक लोकांकडून केले जाते. गांवकऱ्यांकडून त्यांच्या मदतीने अथक प्रयत्नातुन या सभोवतालच्या परिसरामध्ये मनमोहक गवतांची कुरणे तयार करण्यात आली आहेत. वनविभागाने रामदीघी, जामनी, खातोडा व बोटेझरी या गांवांच्या सभोवताल समृध्द कुरणे तयार केली आहेत.
- वनांवर आधारीत बांबु कटींग, तेंदुपान गोळा करणे इत्यादी किरकोळ व्यवसायांनासुध्दा कोर क्षेत्रामध्ये बंदी करण्यात आली आहे. या ठिकाणी बंदी घातली नसती तर वन ऐवजाच्या माध्यमातुन वनविभागाला चांगला महसुल मिळाला असता. केवळ आरक्षीत वनांच्या 3 किमी. पर्यन्तच्या परिसरामध्ये तेंदुपाने गोळा करण्याची परवानगी दिली आहे. तसेच पाळीव प्राणी गुरे ढोरे चारण्याची परवानगी सुध्दा कोर क्षेत्रामध्ये नाकारण्यात आली आहे. केवळ लगतचा जो भाग आहे त्या ठिकाणी गुरेढोरे चारण्याची परवानगी (TATR) ने दिली आहे.
- कोर क्षेत्रामध्ये कृत्रीम टाक्यांद्वारे प्राण्यांकरीता नियीमत पाणी पुरवठा केल्या जाते व त्याची देखरेख नियमित केल्या जाते, तसेच या क्षेत्रात ताडोबा, जामनी, पांगडी, कारवा, पिंपळहेटी, बोटेझरी, कोळसा, पिपरी, इरईडॅम, मोहर्ली, तेलीया व महालगांव इत्यादी मध्यम व मोठया आकाराची तलाव आहेत. तसेच पांढरपौणी 1 व 2 कुंभी, रानतळोधी, पळसगांव, बामनगांव, पहाती ही हंगामी तलाव तर पंचधारा, वसंत बंधारा, वाघा, चिंचघाट, कोसेकानार, शिवनी, झरी इत्यादी बंधारे आहेत जे प्राण्याची तहान भागावण्यास हातभार लावतात. एप्रिल–मे या महीण्यामध्ये दाहक उष्णता असल्याने संपुर्ण पाणवठे कोरडी पडतात अशा वेळेस ताडोबा प्रषासनाकडून कृत्रीम टांक्यांद्वारे वन्यप्राण्यांना पाणी पुरवठा केल्या जाते.
- काही राष्ट्रीय व आंतराश्ट्रीय संस्था सुध्दा (TATR) मधिल प्राणी व वनस्पती यांच्या संरक्षणांकरीता मदत करीत असल्याचे पहावयास मिळते. यात **'मिनीष्ट्री ऑफ एनवॉरमेंट ॲन्ड फॉरेस्ट'**, **'नॅशनल टायगर कंझर्वेशन ऑथरिटी'**, **'बोटॅनिकल सोसायटी ऑफ इंडिया'**, **'झुलॉजीकल सोसायटी ऑफ इंडिया'**, **'महाराष्ट्र टूरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन' 'इंटरनॅशनल युनियन फॉर कंझर्वेशन ऑफ नेचर' 'वर्ड वाईड फन फॉर नेचर'** तसेच काही राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील स्वंयसेवी संघटना, त्याच प्रामणे विविध आंतराष्ट्रीय संघटन जसे, **'नॅशनल ज्यॉग्रफिकल सोसायटी'** इत्यादी संघटना वाघांच्या स्वंरक्षणाकरीता व प्रयत्नशिल आहेत. तसेच जगातील नष्ट होण्याच्या मार्गावर वनस्पती व प्राण्यांच्या संरक्षणाकरीता कार्यरत आहेत त्यात (TATR) चा सुध्दा समावेश आहे.
- स्थानिक स्वंयसेवी संघटना, ताडोबा प्रशासनाला विविध माध्यमातुन यथायोग्य मदत करीत असतात. या संघटना सतत कोणत्या ना कोणत्या प्रकारे ताडोबा प्रशासनाच्या संपर्कात असतात, जंगलातील गुप्त माहीती, पानवठे गुण्हेगारांची माहीती तसेच अन्य माहीती प्रशासनाला कळवीत असतात. प्राण्यांची जनगनना, पाणीपुरवठा, खेड्याांचे पुर्नवसन या सर्व कामांमध्ये स्वंयसेवी संस्थानी स्वईच्छेने वनविभाग व ताडोबा प्रशासनाला मदत केली आहेत.

**तक्ता क्र 1: (TATR) मधील प्राण्यांची संख्या**

| वर्ष / प्राणी | 1994 | 1996 | 1998 | 2000 | 2002 | 2004 | 2006 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाघ | 36 | 40 | 43 | 38 | 38 | 44 | 41 |
| चिता | 29 | 30 | 15 | 22 | 22 | 22 | 21 |
| चितळ | 2539 | 3231 | 2039 | .. | 2008 | 2700 | 1795 |
| सांबर | 516 | 673 | 669 | .. | 516 | 1150 | 1052 |
| गवा | 619 | 746 | 1052 | .. | 853 | 1350 | 878 |
| हरिण | 413 | 633 | 512 | .. | 283 | 425 | 401 |
| निलगाय | 146 | 234 | 228 | .. | 102 | 325 | 208 |

**स्त्रोतः** Tiger conservation plan, TATR, 2009.

## ६ परिणामांचे विश्लेषण (Result and Discussion)

**'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये'** वन्यजीवांची संख्या वाढविण्याकरीता, समृध्द करण्याकरीता, त्यांची जोपासना करण्याकरीता वनविभागाने केलेल्या सर्व प्रयत्नांना यश आले आहे. कारण दिवसेंदिवस (TATR) च्या कोर क्षेत्रातील प्राण्यांची संख्या वाढत आहे, येथे आजघडीला 43पेक्षा जास्त वाघांची संख्या आहे, दरवर्षी वाघांची जनगनना नियमीतपणे केल्या जाते. (TATR) मध्ये दिवसेंदिवस कोर क्षेत्रामध्ये प्राण्यांची संख्या सातत्याने वाढत आहे, हे या प्रकल्पाची यशस्विता दर्शविते.

- **प्रकल्पातील वाघांचे परिक्षणः** वन्यप्राणी व वनांचे संरक्षण करने हे (TATR) चे मुख्य उद्येश आहे. शास्त्रिय, आर्थिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय समतोल सुनिश्चीत करण्याकरीता व कायम अशिच स्थिती ठेवणे हा मुख्य उद्येश या व्याघ्र प्रकल्पाचा आहे, लोकांचे स्वास्थ, शिक्षण आनंद घेण्याकरीता एक नैसर्गिक वारसा म्हणून जैविक क्षेत्र महत्वाची आहेत.

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 3, Issue - 1, Jan-Feb – 2020
Bi-Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.589
Received on : 12/01/2020 Accepted on : 25/01/2020 Publication Date: 28/02/2020

वन्यजीव व्यवस्थापन, वाघांचे संरक्षण व संवर्धन, जैवविविधतेचा विकास ही प्रकल्पाची इतर वैशिष्टे आहेत, तसेच वाघांच्या संवर्धनासोबतच त्याचे सहशिकाÚयांचे सुध्दा संरक्षण व संवर्धन करणे होय. वरील विश्लेशनावरुन लक्षात येते की, आरक्षित क्षेत्रावर लोकांचा वापर कमी करने गरजेचे आहे.

- (TATR) **मधिल पर्यटन, वन्यजीवांवर दबाव व त्याचे व्यवस्थापनः** (TATR) मध्ये पर्यटनामुळे वन्यप्राण्यांच्या स्वरंक्षणाच्या प्राथमिकतेकडे लक्ष विचलित झाले आहे. परंतु पर्यटन कीया दुच्यम स्वरुपाची आहे. व्याघ्र प्रकल्पातील पर्यटनाचा आर्थिक फायदा (TATR) सोबतच त्याच्या सभोवतालल्या खेड्यांतील लोकांना झाला आहे. येथिल पर्यटन दुÓयम भूमिका पार पाडतो एकीकडे आर्थिक विकासाला चालना देतो परंतु दुसरीकडे पर्यटना मुळे येथिल प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. व्याघ्रप्रकल्पातील पर्यटना करीता सर्वोच्यन्यायालयाने काही मार्गदर्शक तत्व ठरवीले आहे. ही सर्व मार्गदर्षक तत्वे **'नॅशनल टायगर कंझर्वेशन ऑथारिटी'**ला अधिन आहेत. व्याघ्रसंवर्धन आणि पर्यटन मार्गदर्षक तत्वे 380 (1) (ब) वन्यप्राणी संरक्षण कायदा 1972 यावर हे सर्व नियम आधारित आहेत. महाराष्ट्र शासनाचा (2013) जैव पर्यटन कायदा सुध्दा याच कायद्याप्राणे आहे, प्राण्यांच्या संवर्धनास प्रथम प्राधान्य द्यावे व वन्यजीव कार्यात अळथळा आणू नये हा या कायद्याचा मुख्य उद्येश आहे. आज **'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा'**तील पर्यटन हे या धोरनांचे आणि नियमांचे दिशादर्षक आहे. राज्यात प्रत्येक व्याघ्रप्रकल्पात स्थानिक पर्यटन समिती आहे जी उत्तम व पर्यावरणास अनुकूल पर्यटनासाठी नियम बनवीते. स्थानिक पर्यटन समिती मध्ये **प्रादेशिक आयुक्त**, **विधानसभा सदस्य**, **जिल्हाधिकारी**, **क्षेत्रनिर्देशन, विभागीय वनाधिकारी, जिल्हा पर्यटन आधिकारी, जिल्हा आदिवासी अधिकारी** व **स्वयंसेवी संघटनांच्या सभासदांचा** समावेश होतो. वन्यजीवांवर पर्यटनाचा जास्त दबाव येवू नये हे लक्षात घेवुन या समितीने पुढील उपाययोजना करण्याचे आणि पुढाकार घेण्याचे सुचविले आहे.

- **पर्यटन उपक्रमांतर्गत क्षेत्रः** (TATR) चा संपुर्ण भाग पर्यटनाकरीता खुला नाही, आरक्षित क्षेत्रापैकी केवळ 20टक्के क्षेत्र पर्यटनाकरीता खुला आहे. तत्सम मार्गदर्शक तत्वाने सर्वोच्य न्यायालयाने यापुर्वी आदेश दिलेला आहे की, व्याघ्र प्रकल्पाच्या रस्त्यांची रुंदी 5 मीटर व दोन्ही बाजुने 20 मीटर, प्रभाव क्षेत्राच्या 45 मीटर क्षेत्रात असावा म्हणजेच प्रभावीत क्षेत्राच्या 11.61 वर्ग किमी. एकुण क्षेत्राच्या 1.85 टक्के क्षेत्र पर्यटकांसाठी खुले आहे.
- **पर्यटन (विभाग) ब्लॉकः** (TATR) मध्ये पर्यटनाकरीता **ताडोबा**, **मोहर्ली** व **कोळसा** अश्या तीन विभागात विभागला गेला आहे, आणि या विभागातील रस्त्यांची उपलब्ध्दता, लांबी व वहन क्षमता लक्षात घेवुन पर्यटकांना पर्यटनांची परवानगी दिली जाते. कोळसा विभागात 40, मोहर्ली 48, व ताडोबातील 35 किमी. पर्यन्ताचा भाग पर्यटना करीता खुला आहे. (TATR) मधील क्षेत्र निर्देशकांच्या आदेंशानुसार एकुण क्षेत्राच्या 20 टक्के क्षेत्र खुला करण्यात आला आहे.
- **सफारी नोंदनी (बुकींग):** सफारी बुकींगची सुविधा (TATR) प्रषासनाने ऑनलाईन संकेतस्थळावर दिली आहे, एकुण पर्यटकांच्या 70 टक्के ऑनलाईन, 15 टक्के त्याच दिवशी प्रवेशद्वारावर प्रत्येक शिप्टला व 15 टक्के वनविभागातील कर्मच्याऱ्यां करीता आरक्षीत आहेत.
- **पर्यावरणीय संवेदन क्षेत्राची ओळखः** स्थानिक सल्लागार समितीने **'ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प'** मधिल पर्यावरणीय संवेदन क्षेत्राची ओळख निर्धारीत केली आहे, या क्षेत्रामध्ये वन्यजीव विस्कळीत होण्याचा धोका असल्याने पर्यटनस परवानगी नाकारली आहे. या क्षेत्रांमध्ये ठानेगांव, जुनोना, देवाडा, अडेगांव, आगरझरी, चोरगांव, निंबाडा, पहामी, हळदी, झरी, डोनी, पांगडी, पिंपळहेटी, कारवा, पांढरपौणी, चिंचघाट, खुटवंडा, आंबेझरी, सितारामपेठ, मोहर्ली, मामला, फुलझरी व घोसरी यांचा समावेश आहे. या खेड्यांच्या सभोवतालच्या परिसरांना एक संवेदनशिल क्षेत्र मानले आहे आणि खेड्यांच्या सभोवताल व शेती करण्यास मज्जाव केला आहे तसेच संवेदन क्षेत्राच्या सभोवतालचे व्यावसायीकरण थांबविण्यासाठी नियम तयार केला आहे.
- **(TATR) मधील प्रवेषद्वारः** (TATR) मध्ये प्रवेश करण्या करीता केवळ सहा प्रवेशद्वार आहेत, ते नागपूर, चंद्रपूर, वर्धा व गोंदीया या मुख्य षहराशी जोडले आहेत. **मोहर्ली, खुटवंडा, नवेगांव, कोलारा, झरी व पांगडी** ही मुख्य प्रवेशद्वार आहेत. सभोवतालच्या परिसरातील प्रकल्पग्रस्तांना (TATR) कडून विशिष्ट पर्यटन वाहन दिले आहेत, व त्याची नोंदनी करुन घेतली आहे. याचा आर्थिक लाभ खेड्यातील तरुनांना झाला आहे. बाजुंच्या खेड्यामध्ये इको डेव्हलपमेंट समिती स्थापन केली आहे आणि या समितीच्या सदस्यांना पर्यटन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे.
- **काय करावे काय करु नयेः** पार्कच्या परिसरामध्ये काय करावे काय करु नये यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे दिले गेले आहेत. जंगल सफारीच्या वेळेस पर्यटक गाईड सोबत घेणे अनिवार्य आहे, दोन गाड्यांमधील अंतर कमीत कमी 50 मीटर असावा, पार्क परिसरात केरकचरा करणे किंवा उघड्यावर टाकने मनाई करण्यात आले आहे. पर्यटन मोटरच्या खाली उतरने मनाई आहे, पर्यटन वाहनाचा वेग दर तासी मर्यादा सुध्दा ठरवून दिली आहे, याची कमाल मर्यादा 25 पेक्षा जास्त नसावी तसेच समोरच्या वाहनाला मागेटाकून पुढे जाता येत नाही यावर सुध्दा बंदी घातली

आहे. रेडीओ, टेपरेकर्डर, मोबाईल यांच्या आवाजावर सुध्दा बंदी घातली आहे, ज्याचा त्रास प्राण्यांना होणार नाही. दिवसेंदिवस पर्यटक या पार्क कडे मोठ्याा प्रमाणात आकर्षीत झाले आहेत, केवळ देशातीलच नाही तर विदेशी पर्यटकांची संख्या सुध्दा लाक्षनीक आहे. 2018 भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या एक लाखापेक्षा जास्त होती शासकिय नियोजना नुसार बफरझोन मधील खेड्यांमध्ये इकोडेव्हलपमेंट समिती तयार केली आहे हीच्या माध्यमातुन गांवामध्ये विविध योजना राबविल्या जातात. पर्यटकांकडून मिळणाऱ्या नफ्यातुन खेड्यांना आर्थिक सहकार्य केले जाते. त्यामुळे (TATR) माध्यमातुन ग्रामस्थांना आर्थिक दृष्ट्याा स्वावलंबी होण्यास मदत होत आहे, यात किंचीतही शंका नाही.

**तक्ताः 2 (TATR) ला भेट देणारे एकुण पर्यटक व वाहणांची संख्या**

| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
|---|---|---|---|---|---|
| **वर्श** | **1998** | **1999** | **2000** | **2001** | **2002** |
| **पर्यटक** | 44029 | 41044 | 35917 | 39452 | 33632 |
| **एकुण वाहणे** | 4495 | 4678 | 5245 | 4217 | 4975 |
| **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| **2003** | **2004** | **2005** | **2006** | **2007** | **2008** |
| **36945** | 37215 | 34361 | 40626 | 57169 | 62444 |
| **5741** | 5951 | 5578 | 5976 | 8903 | 9788 |

**स्त्रोतः** Tiger conservation plan, TATR, 2009.

## ७ निष्कर्ष (Conclusion) :

'चंद्रपूर' जिल्ह्यातील '**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प**' महाराष्ट्रातील एक महत्वपुर्ण पर्यटन केंद्र आहे. या व्याघ्र पकल्पातील वन्यजीव व्यवस्थापन फार पूर्वीपासून चालु आहे. परंतु उपस्थित व्यवस्थापन व्यवस्थेच्या तुलनेत लवचिक होत आहे. या प्रकल्पाच्या कोर क्षेत्रामध्ये खेळण्याकरीता परवानगी दिली आहे, परंतु अलीकडच्या काही वर्षात येथे वन कायद्याचे कठोर नियम लावण्यान आले आहे. पूर्वी लोक सायकल आणि मोटार सायकलने उद्याणाला कोणत्याही प्रकारे भेट देत असत, तशी परवाणगी होती परंतु आज यावर पुर्णपणे बंदी घातली आहे आणि केवळ (TATR) प्रषासनाकडून जी इको फ्रेंडली वाहने ठेवली आहेत त्यांनाच परवानगी आहे. प्रत्येक प्रवेशद्वांराची प्रवेश क्षमता लक्षात घेवुन ऑनलाईन आरक्षण ठरविल्या जाते. जंगलातील प्राण्यांना मानवांचा त्रास होऊ नये म्हणून कोर क्षेत्रांमध्ये गावाचे आर्थिक मोबदला देवुन पुर्नरवसन केले जात आहे. पर्यटनापासून मिळणारा आर्थिक फायदा गावांना वितरीत केले जाते, आणि त्यांना पर्यटन वाहनेसुध्दा पुरविली जात आहेत. पर्यटकांनी पार्क मध्ये आपले व्यवहार इको फ्रेंडली ठेवणे आवश्यक आहे, Do and Donts या नियमांचे पालन न केल्यास शिक्षा ठोठावली जावु शकते. (TATR) मधील पर्यटकांचा भार कमी करण्यासाठी कोर क्षेत्रा व्यतीरिक्त बफर झोन मधील काही भागामध्ये पर्यटन विकासा करीता प्रयत्न केल्या जात आहे.

## संदर्भ (References) :

1. Gazatter of India, Maharshtra state, Chandrapur District, 1973.
2. 'National Biodiversity Action Plan' Ministry of Environment and forest, Govt. of India, 2008.
3. Eco-tourism plan, TATR, 2003.
4. Working plan for Chandrapur forest, North Chandrapur. Circle vol 1(2003-04).
5. Ghate Rucha and Ghate Suresh, A Story of Conservation refugee: Vulnerability and coping strategies,
6. Patil, S.H., Tiger conservation plan, TATR, 2008.
7. Travel guide leaflet of TATR.
8. 'Project tiger' Administrative approval, for TATR-2013-14.
9. http://projecttiger.nic.in/introduction.html.
10. Tiger Conservation plan, TATR, 2007.
11. Eco-Tourism policy, govt. of Maharashtra (2013).